**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्र.शिससं/उशि/पुवि/नाहप्र-शिक्षक भरती/२०२४/5568 दि. २३/०४/२०२४

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे / अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्य / सहायक प्राध्यापक पदभरतीसाठी नाहरकत प्रमाणपत्र मागणीसाठी सुधारीत बिंदू नामावली विहीत करण्याबाबत..**

संदर्भ - संचालनालयाकडील पत्र क्र. उशिसं/पदभ/२०२४/मवि-१/ 1/303463/2024 दिनांक ६.३.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन पदभरतीसाठी पात्र असणा-या सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) (Social and Educationally Backward Classes) (SEBC) असा नवीन वर्ग निर्माण करण्यात आला असून या वर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे. उपरोक्त अधिनियमातील कलम ५ (१) नुसार सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गासाठी, राज्याच्या अखत्यारितील लोकसेवांमधील शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १० टक्के आरक्षण विहीत करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदूनामावली विहीत करण्या संदर्भातील सूचना संदर्भिय शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करुन सुधारीत बिंदूनामावली संबंधित आस्थापनांकडून तपासून घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी. **सदरची कार्यवाही ही फक्त ज्या महाविद्यालयांना पदभरतीसाठी (प्राचार्य/सहाय्यक प्राध्यापक/ग्रंथपाल/शारीरिक शिक्षण संचालक) मान्यता आहे अशाच महाविद्यालयांनी करावी.**

(डॉ. केशव तुपे)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

सोबत - वरीलप्रमाणे शासन निर्णय व परिपत्रक

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सविनय सादर.